जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
आवक क्र. 86606
2 2008

**शेतकरी आत्महत्या प्रकरणातील पात्र प्रकरणात मृतकाचे वारसास अनुदान वितरीत करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-एससीवाय२००८/प्र.क्र.२५/म-७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २० सप्टेंबर, २००८**

वाचा :- शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एसयूपी २००८-०९/प्र.क्र.१९२/ब-१, दिनांक ६.८.२००८

**शासन निर्णय :**

शेतकरी आत्महत्या प्रकरणातील पात्र प्रकरणात मृतकाचे वारसास शासनाकडून रुपये १.०० लाख सानुग्रह अनुदान देण्यात येते. मा. पंतप्रधानाचे विशेष पॅकेज लागू होण्यापूर्वी हे अनुदान मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून देण्यात येत होते. त्यासाठी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आलेली नव्हती. पॅकेज लागू झाल्यानंतर शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक मकोनि-१००६/प्र.क्र.७९/कोषा-प्र-५, दिनांक २१.४.२००६ नुसार सन २००६-०७ व २००७-०८ या कालावधीत महाराष्ट्र कोषागार नियम १५३ (दहा) अंतर्गत अर्थसंकल्पीय अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतचे हमीपत्र देऊन सदर सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे.

२. शेतकरी आत्महत्या प्रकरणी तातडीने मदत देण्यात येणा-या सहाय्यक अनुदानाची देयके सदर प्रश्नाची संवेदन क्षमता लक्षात घेऊन वित्त विभागाने दिनांक ३०.६.२००८ पर्यंत महाराष्ट्र कोषागार अधिनियम १९६८ मधील नियम १५३ (दहा) प्रमाणे देण्यात येणा-या प्रमाणपत्राच्या आधारे बीडीएस प्राधिकार पत्राशिवाय पारित करण्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे यांना दिनांक २९.५.२००८ च्या पत्रान्वये निदेश दिले आहेत तसेच सदर प्रयोजनार्थ अर्थसंकल्पीय तरतूद तातडीने उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्याबाबत या विभागाला कळविले होते. त्यानुसार सन २००६-०७ व २००७-०८ या वर्षात झालेल्या आत्महत्या प्रकरणांमध्ये पात्र प्रकरणात मृतकाचे वारसास सानुग्रह अनुदान वाटप करण्यासाठी बीडीएस प्राधिकार पत्राशिवाय कोषागारातून काढण्यात आलेल्या रुपये ११.४७ **कोटी रक**मेच्या अनुदानाची मागणी सर्व विभागीय आयुक्तांकडून करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक ३०.७.२००८ मध्ये प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २००८ (सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५) नुसार शासन निर्णय दिनांक एसयुपी-२००८-२००९/प्र.क्र.१९२/ब-१, दिनांक ६.८.२००८ अन्वये रुपये ११.४७ कोटी इतक्या रकमेचे पूरक अनुदान शासनाने मंजूर केले आहे. सदर अनुदान सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात होणा-या खर्चासाठी वापरण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर पूरक अनुदान सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार सर्व विभागीय आयुक्त तथा नियंत्रक अधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

३. आहरण व संवितरण अधिका-यांनी कोषागार / उपकोषागार यांचेकडे पाठविण्यात येणा-या बिलासोबत जोडल्या जाणा-या कॉम्प्युटर स्लीपमध्ये गौण / उपशिर्षाच्या गणकयंत्र संकेतांकांचा न चुकता उल्लेख करावा.

ROTA/H-2033(300-9-2008)-1

KWSP file

GNCL090801

४. खर्चाचा मेळ महालेखापाल यांनी नोंदविलेल्या खर्चाशी घेण्यात यावा व महालेखापालांच्या ताळमेळ प्रमाणपत्रासह विनियोजन लेखे शासनाकडे तात्काळ पाठवावेत.

५. यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-५, मुख्य लेखाशिर्ष -२२३५.सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाज कल्याण १०४ वृध्द, अपंग व निराश्रीतांचे कल्याण (००) (०३) आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसांना वित्तीय सहाय्य ३१ सहाय्यक अनुदान (२२३५ ३१९५) (योजनेतर) (दत्तमत) या लेखाशिर्षाखाली महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक ३०.७.२००८ मध्ये प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २००८ (सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५) नुसार शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एसयूपी२००८-२००९/प्र.क्र.१९२/ब-१, दिनांक ६.८.२००८ च्या पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

६. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ८४५/०८/अर्थ-६, दिनांक १५.९.२००८ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जि. शां. वाणी )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
महालेखापाल -१/२(लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
महालेखापाल -१/२(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभाग (व्यय-९ / अर्थसंकल्प-६), वित्त विभाग
अवर सचिव म-११ / म-३, कक्ष अधिकारी ब-१
निवडनस्ती, म-७ कार्यासन, महसूल व वन विभाग.

H-2033 -1a